


Subscribe इयत्ता – सहावी (13 जुलै) माझा अभ्यास Subscribe

## शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

# दिवस तेरा :






गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

टेस्ट सोडवा

वाचा व समजून घ्या. सराव करा.

# ३ डॉ. कलाम यांचे बालपण

ATTRUT

**डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम** –(१९३१–२०१५) विख्यात अणुशास्त्रज्ञ, भारताचे माजी राष्ट्रपती, मनस्वी वृक्षप्रेमी, हाडाचे शिक्षक आणि बालकप्रेमी. 'विंग्ज ऑफ फायर', 'इंडिया २०२०', 'ए व्हिजन फॉर द न्यू मिलेनियम' आणि 'इग्नायटेड माइंड्स्' इत्यादी पुस्तके प्रसिद्ध. 'पद्मभूषण', 'पद्मविभूषण' आणि 'भारतरत्न' पुरस्कारांनी सन्मानित. डॉ. कलाम यांच्या 'विंग्ज ऑफ फायर' या आत्मचरित्राचा माधुरी शानभाग यांनी 'अग्निपंख' या नावाने अनुवादित केलेल्या पुस्तकातून खालील प्रसंग घेतले आहेत.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत शिकण्याची जिद्द, त्यांच्या जीवनावर आई-वडिलांचा पडलेला प्रभाव आणि बहीण-भाऊ यांचा सहवास यांतून डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या बालपणीच्या जडणघडणीचे चित्रण या पाठातून केलेले आहे.



- तुम्हांला वाचन करायला आवडते का?
- तुम्ही कोणकोणती पुस्तके वाचली आहेत?
- त्यांतील कोणते पुस्तक तुम्हांला सर्वांत जास्त आवडले? का?
- तुम्हांला आवडलेल्या पुस्तकातील चार वाक्ये लिहा.



माझ्या बालपणीच्या जगात पुस्तकं म्हणजे माझ्यासाठी एक दुर्मिळ वस्तू होती. आमच्या गावात एस.टी.आर. माणिकम नावाचे एक क्रांतिकारक राष्ट्रभक्त राहत होते. त्यांच्याकडे पुस्तकांचा बऱ्यापैकी संग्रह होता. त्यांनी मला पुस्तके वाचण्यासाठी सदैव उत्तेजन दिले. मीही मिळेल ते वाचत गेलो. पुस्तके मागण्यासाठी मी त्यांच्या घरी धाव घेत असे.

माझ्या लहानपणी शमसुद्दीन नावाच्या माझ्या एका दूरच्या भावाचा माझ्यावर बराच प्रभाव होता. रामेश्वरममध्ये येणाऱ्या वर्तमानपत्रांचा तो एकुलता एक वितरक होता. रोज सकाळच्या रेल्वेगाडीने 'पंबन' गावाहून वृत्तपत्रांचे गठ्ठे येत. गावातल्या हजारभर सुशिक्षितांच्या वाचनाची गरज भागवणाऱ्या शमसुद्दीनचा व्यवसाय म्हणजे एकखांबी तंबू होता. स्वातंत्र्याच्या चळवळीची वाटचाल ग्रामस्थांना समजणे हे महत्त्वाचे कार्य त्यातून साधत असे. कुणाला भविष्य जाणून घेण्यात रस असे, तर कुणी चेन्नईच्या (मद्रास) बाजारपेठेतले सोन्याचांदीचे भाव समजण्यासाठी उत्सुक असत. थोडेजण जिज्ञासूवृत्तीने हिटलर, महात्मा गांधी आणि बॅरिस्टर जीनांबद्दल गांभीर्याने चर्चा करत; पण झाडून सर्वजणांना पेरियार ई. व्ही. रामस्वामी यांच्या चळवळीबद्दल जाणून घेण्यात रस होता. 'दिनमणी' हे त्या वेळचे सर्वांत लोकप्रिय 'तमिळ' वर्तमानपत्र होते. छापलेले शब्द त्यावेळी मला वाचायला येत नसत. त्यातील चित्रांकडे बघून मी समाधान मानत असे. शमसुद्दीन आपल्या गिऱ्हाइकांना पेपरचा अंक वाटण्यापूर्वी मी त्यातील चित्रे बघून घेत असे.

मी आठ वर्षांचा असताना सन १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध पेटले. काय कारण असेल ठाऊक नाही; पण त्या सुमारास बाजारात चिंचोक्यांना अचानक भरपूर मागणी आली. मी चिंचोके गोळा करून मशिदीजवळच्या एका दुकानात देत असे आणि अख्खा

एक आणा कमावत असे. माझ्या वडिलांनी लाकडी नौका बांधायचा व्यवसाय करायचे ठरवले. अहंमद जलालुद्दीन नावाच्या एका आमच्याच गावातल्या कंत्राटदाराबरोबर समुद्रकिनारी ते रोज काम करू लागले. पुढे जलालुद्दीन यांनी माझ्या बहिणीशी–जोहराशी विवाह केला आणि आमच्याशी नाते जोडले. जलालुद्दीन मला युद्धाच्या कथा सांगत असे आणि मग दिनमणीच्या शीर्षकातून मी त्या शोधत राही. आमच्या छोट्या दूरस्थ गावात युद्धाचे दृश्य परिणाम जाणवणे जवळजवळ अशक्य होते; पण हळूहळू भारताला सक्तीने युद्धात सामील व्हावे लागले आणि देशात आणीबाणी पुकारली गेली.

रोज सकाळी पंबनहून येणारी रेल्वेगाडी रामेश्वरमला थांबेनाशी झाली. हा युद्धाचा आमच्या गावावर पहिला ठळक परिणाम झाला होता. मग चालत्या रेल्वेगाडीतून वर्तमानपत्रांचे गठ्ठे रामेश्वरम ते धनुष्कोडीदरम्यान खाली फेकले जात. ते गठ्ठे गोळा करण्यासाठी शमसुद्दीनला कुणीतरी मदतनीस हवा होता. माझ्यापेक्षा दुसरा योग्य उमेदवार त्याला कुठून मिळणार? माझ्या आयुष्यातील पहिली कष्टाची कमाई करायला शमसुद्दीनचा असा हातभार लागला. आज अर्धशतकानंतर मी वळून त्या क्षणांकडे पाहतो आणि त्यावेळी स्वतःच्या कष्टाने मिळवलेल्या पहिल्या कमाईचा अभिमान आजही माझ्या मनातून ओसंडून वाहू लागतो.

माझ्या वडिलांकडून मी प्रामाणिकपणा आणि स्वयंशिस्त शिकलो, तर आईने मला चांगल्यावर विश्वास ठेवायची आंतरिक शक्ती दिली, दयाळू वृत्ती दिली. अर्थात माझ्या तिन्ही भावांनी आणि एका बहिणीनेदेखील हा ठेवा त्यांच्याकडून उचलला; पण मला जो जलालुद्दीन आणि शमसुद्दीन यांचा निकट सहवास घडला, त्याने मी स्वतंत्र, वेगळा असा बनत गेलो. शाळेत शिकायला न मिळालेले शहाणपण मी जलालुद्दीनकडून शिकलो, तर शमसुद्दीनकडून मी चेहऱ्यावरून दुसऱ्याच्या मनातले, शरीराची व डोळ्यांची भाषा ओळखायला शिकलो. माझ्यामध्ये जो सर्जनशीलतेचा स्रोत उगम पावत, फुलत, खळाळत गेला, त्याचे श्रेय मी निःसंशय त्या दोघांच्या सहवासात माझ्यावर पडलेल्या प्रभावाला देतो.

रामेश्वरम सोडून जिल्ह्याच्या ठिकाणी रामनाथपुरमला शिक्षण घेण्यासाठी मी माझ्या वडिलांकडे परवानगी विचारली. विचारात पडल्यासारखे ते क्षणभर गप्प झाले. विचार करता करता त्यांना शब्द लाभावेत आणि ते ओठातून बाहेर पडावेत तसे वडील बोलू लागले. ते मला म्हणाले, 'अबुल, तुला मोठे व्हायचे असेल, तर गाव सोडून शिक्षणासाठी बाहेर जायलाच हवे. सीगल पक्षी घरटे सोडून, एकटे दूरवर उडत जातात आणि नवे प्रदेश शोधतात. तसे या मातीचा आणि इथल्या स्मृतींचा मोह सोडून तुझ्या इच्छा–आकांक्षा जिथे पूर्ण होतील, तिथे तुला जायला हवे. आम्ही आमच्या प्रेमाने तुला बांधून ठेवणार नाही, आमच्या गरजा तुझा रस्ता अडवणार नाहीत.' माझी आई मला दूर पाठवायला काळजीने आढेवेढे घेत होती.

शमसुद्दीन आणि जलालुद्दीन माझ्यासोबत रामनाथपुरमला आले. त्यांनी माझे नाव शाळेत घातले, माझी राहण्याची नीट व्यवस्था केली, पण श्वार्झ हायस्कूल अन् या नव्या वातावरणात माझा जीव रमेना. पन्नास हजारांवर वस्ती असलेल्या या शहरात सदैव गजबज असायची; पण रामेश्वरमला जसा एकजिनसीपणा होता तसा इथे माझ्या अनुभवाला आला नाही. मला घराची ओढ अस्वस्थ करायची आणि म्हणून रामेश्वरमला जायची प्रत्येक संधी मी उडी मारून साधायचो. इथे असलेल्या शिक्षणाच्या उदंड संधींपेक्षा आईच्या हाताच्या गोड पोळ्यांची ओढ मला मोलाची वाटत असे. हळूहळू माझे घरापासून दूर जाणे मी स्वीकारत गेलो. नव्या वातावरणाशी जुळवून घ्यायचे मी मनाशी ठरवले. कारण माझ्या वडिलांच्या माझ्याकडून विशेष अपेक्षा आहेत हे मला ठाऊक होते. मी कलेक्टर व्हावे अशी त्यांची इच्छा होती. त्यांचे स्वप्न पुरे करणे माझे कर्तव्य होते. त्यासाठी रामेश्वरममध्ये वाटणारी सुरक्षितता, तिथले प्रेमळ वातावरण यांचा त्याग करणे मला भाग होते.

## निरीक्षण करा व कोनदूभाजक काढा.


2 कोन

टेस्ट सोडवा


कंपासपेटीतील साधनांचा उपयोग करून भौमितिक रचना कशा करायच्या ते पाहू.

### (1) कंपासच्या साहाय्याने कोनदुभाजक काढणे


**उदा.** कोन ABC हा कोणताही एक कोन काढा. या कोनाचा दुभाजक काढा.




- कोणत्याही मापाचा ∠ABC काढा.
- कंपासमध्ये सोईस्कर अंतर घेऊन त्याचे टोक B बिंदूवर ठेवा. किरण BA व किरण BC यांना छेदणारा एक कंस काढा. छेदनबिंदूंना P व Q नावे द्या.




- आता कंपासमध्ये पुरेसे अंतर घेऊन, कंपासचे टोक P बिंदूवर ठेवून, कोनाच्या अंतर्भागात एक कंस काढा. कंपासमध्ये तेच अंतर कायम ठेवून, कंपासचे टोक Q बिंदूवर ठेवून, पूर्वीच्या कंसाला छेदणारा दुसरा कंस काढा.





- दोन कंसांच्या छेदनबिंदूला O नाव द्या. किरण BO काढा. किरण BO हा ∠ABC चा दुभाजक आहे. कोनमापकाने ∠ABO आणि ∠CBO मोजा.
- हे कोन समान मापांचे आहेत का ?


### (2) दिलेल्या कोनाच्या मापाएवढे माप असणारा कोन, कंपास व पट्टीच्या साहाय्याने काढणे

**उदा.** सोबतच्या आकृतीत दिलेला ∠ABC पाहा.

त्यावरून ∠ABC एवढा ∠PQR काढा.




- किरण QR काढा.
- कंपासमध्ये सोईस्कर अंतर घ्या.
- कंपासचे टोक ∠ABC च्या शिरोबिंदू B वर ठेवा आणि किरण BA व किरण BC यांना छेदणारा कंस काढून या छेदनबिंदूंना D व E नावे द्या.
- कंपासमध्ये घेतलेले अंतर कायम ठेवा. कंपासचे टोक किरण QR च्या बिंदू Q वर ठेवून एक कंस काढा. हा कंस रेषा QR ला ज्या बिंदूत छेदेल त्या बिंदूस T नाव द्या.
- आता कंपासचे टोक E बिंदूवर ठेवून कंपासमधील पेन्सिलचे टोक D वर पडेल इतके अंतर कंपासमध्ये घ्या.




टेस्ट सोडवा

## Observe and draw the angle divider.


Let us see how to use geometrical instruments to construct geometrical figures.

### (1) To draw an angle bisector using a compass.


**Example:** Draw any angle ABC. Draw its bisector.




- Draw an angle ∠ABC of any measure.
- Now place the point of a compass on point B and with any convenient distance draw an arc to cut rays BA and BC. Name the points of intersection as P and Q respectively.




- Now, place the point of the compass at P and taking a convenient distance, draw an arc inside the angle. Using the same distance, draw another arc inside the angle from the point Q, to cut the previous arc.






- Name the point of intersection as point O. Now draw ray BO. Ray BO is the bisector of ∠ABC. Measure ∠ABO and ∠CBO.
- Are they of equal measure?

### (2) To construct an angle equal in measure to a given angle, using a compass and ruler.

**Example:** Look at the given ∠ABC in the figure alongside. Draw ∠PQR equal in measure to ∠ABC.

- Draw ray QR.
- Place the compass point at vertex B of ∠ABC and taking a convenient distance, draw an arc to cut the rays BA and BC at points D and E respectively.
- Using the same distance again, place the compass point at point Q of ray QR and draw an arc. Let this arc cut the ray QR at T.
- Now place the point of the compass at point E and open the compass to a distance equal to DE.



टेस्ट सोडवा

Read and understand.



## 1.3 The Wild Boar and the Fox

One day, a wild boar was sharpening his tusks against the bark of a tree. He was doing it very carefully. There lived a fox in the same forest. He was always looking for a chance to make fun of other animals in the forest. When he saw the wild boar, he decided to tease him. He began to walk around the trees, looking left and right and up and down. He also began to act as if he was really scared. But the boar did not pay any attention to him. He kept right on with his work.

At last, the fox said with a grin, "Why are you doing that? I tried very hard, but I did not see any hidden enemy or danger."

"True," replied the boar. "Just now there may not be any danger. But when it really comes, there won't be any time to sharpen my tusks. My weapons have to be ready for use then. If I am not ready, I will have to suffer!"

This story tells us that it is best to be prepared. Don't leave things to be done at the last minute.

- **wild :** living in a jungle
- **boar :** a wild pig
- **tusks :** a pair of long pointed teeth that some animals like the elephant have
- **bark :** the tough outer covering of the main tree trunk and branches
- **grin :** smile

पाठ वाचा व समजून घ्या.

# २. इतिहासाची साधने

टेस्ट सोडवा

**करून पहा.**

- तुमच्या परिसरातील/गावातील वस्तु-संग्रहालयाला भेट द्या. तेथे कोणकोणत्या वस्तू आहेत, यावर निबंध लिहा.
- जात्यावरच्या गाण्यांचा संग्रह करा.
- विविध लोकगीते मिळवा. त्यांपैकी एक लोकगीत शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात सादर करा.

## २.३ मौखिक साधने

ओव्या, लोकगीते, लोककथा यांसारखे साहित्य लिहून ठेवलेले नसते. त्याचा कर्ता अज्ञात असतो. ते पिढ्यान्‌पिढ्या जतन झालेले असते. अशा साहित्याला मौखिक परंपरेने जतन झालेले साहित्य असे म्हणतात. ओव्या, लोकगीते, लोककला यांसारखे लोकसाहित्याचे प्रकार यांचा त्यात समावेश होतो. अशा प्रकारच्या साधनांना इतिहासाची 'मौखिक साधने' म्हणतात.

**माहीत आहे का तुम्हांला?**

- **ओवी–**

पांडुरंग पिता । रूक्मिण माझी बया ।
आषाढ वारीयेला । पुंडलिक आला न्याया ।।

- **लोकगीत–**

'महानगरी उजनी* *(उज्जयिनी)
लई पुण्यवान दानी
तेथे नांदत होता राजा
सुखी होती प्रजा
तिन्ही लोकी गाजावाजा
असा उजनीचा इक्राम* राजा' *(विक्रमादित्य)

**माहीत आहे का तुम्हांला?**

### प्राचीन भारताच्या इतिहास-लेखनाची साधने

**भौतिक साधने**

| वस्तू | वास्तू |
| --- | --- |
| गुहाचित्रे | गुहा |
| मातीची भांडी | घरे |
| मातीची शिल्पे | स्तूप |
| मणी | लेणी |
| रत्ने, दागदागिने | मंदिरे |
| दगडी शिल्पे | चर्च |
| धातूच्या वस्तू | मशिदी |
| नाणी | स्तंभ |
| शस्त्रे | |

**लिखित साधने**

- हडप्पा लिपीतील लेख
- वैदिक साहित्य
- मेसोपोटेमियातील इष्टिकालेख
- महाभारत, रामायण यांच्या हस्तलिखित पोथ्या
- जैन, बौद्ध साहित्य
- ग्रीक इतिहासकार आणि प्रवाशांचे लेखन
- चिनी प्रवाशांचे प्रवासवर्णन
- व्याकरणग्रंथ, पुराणग्रंथ, कोरीव लेख

**मौखिक साधने**

प्राचीन भारतातील मौखिक परंपरेने जपलेले वैदिक, बौद्ध आणि जैन साहित्य आता लिखित स्वरूपात उपलब्ध आहे. त्यांचे रूपांतर आता लिखित स्वरूपात झाले असले, तरी त्यांची पठणाची परंपरा अजूनही सुरू आहे. मौखिक स्वरूपातील त्या साहित्याचा उपयोग जेव्हा इतिहास-लेखनासाठी केला जातो, तेव्हा त्याचा समावेश मौखिक साधनांत होतो.

## १. पृथ्वी आणि वृत्ते

टेस्ट सोडवा

**निरीक्षण करून स्वाध्याय सोडवा.**

### स्वाध्याय

**(अ) अचूक पर्यायासमोरील चौकटीत ✓ अशी खूण करा.**

(१) पृथ्वीवर पूर्व-पश्चिम दिशेत असलेल्या काल्पनिक आडव्या रेषांना काय म्हणतात ?

रेखावृत्ते ☐ आंतरराष्ट्रीय वाररेषा ☐ अक्षवृत्ते ☐

(२) रेखावृत्ते कशी असतात ?

वर्तुळाकार ☐ अर्धवर्तुळाकार ☐ बिंदुस्वरूप ☐

(३) अक्षवृत्ते व रेखावृत्ते मिळून पृथ्वीगोलावर काय तयार होते ?

कोनीय अंतर ☐ गोलार्ध ☐ वृत्तजाळी ☐

(४) उत्तर गोलार्धात एकूण किती अक्षवृत्ते आहेत ?

९० ☐ ८९ ☐ ९१ ☐

(५) पूर्व गोलार्ध व पश्चिम गोलार्ध कोणत्या वृत्तांमुळे तयार होतात ?

० ° मूळ अक्षवृत्त व १८० ° रेखावृत्त ☐
० ° मूळ रेखावृत्त व १८० ° रेखावृत्त ☐
उत्तर व दक्षिण ध्रुववृत्ते ☐

(६) खालीलपैकी पृथ्वीगोलावरील बिंदुस्वरूपातील वृत्त कोणते ?

विषुववृत्त ☐ उत्तर ध्रुव ☐ मूळ रेखावृत्त ☐


(७) पृथ्वीगोलावर ४५ ° उ. अक्षवृत्त हे किती ठिकाणांचे मूल्य असू शकते ?


एक ☐ अनेक ☐ दोन ☐


**(ब) पृथ्वीगोलाचे निरीक्षण करून खालील विधाने तपासा, अयोग्य विधाने दुरुस्त करा.**


(१) मूळ रेखावृत्त हे अक्षवृत्तांना समांतर असते.
(२) सर्व अक्षवृत्ते विषुववृत्ताजवळ एकत्रित येतात.
(३) अक्षवृत्ते व रेखावृत्ते या काल्पनिक रेषा आहेत.
(४) ८°४'६५'' उत्तर रेखावृत्त आहे.
(५) रेखावृत्ते एकमेकांना समांतर असतात.

**(इ) पुढीलपैकी योग्य वृत्तजाळी ओळखून तिच्यासमोरील चौकटीत ✓ अशी खूण करा.**

उ.

द. ☐

उ.
☐ 
द.

उ.
 ☐
द.

उ.
☐ 
द.

## २ सजीव सृष्टी

टेस्ट सोडवा

### वाचा व समजून घ्या.

**थोडे आठवा.** चित्रातील विविध घटकांची यादी करून ते सजीव आहेत की निर्जीव ते ठरवा.

### सजीवांची लक्षणे


आपल्या सभोवताली अनेक प्रकारचे प्राणी आणि वनस्पती आढळतात. त्यांमध्ये काही बाबतींत साम्य, तर काही बाबतींत भेद दिसून येतात. तरीही ते सर्व सजीव आहेत हे आपण काही ठराविक वैशिष्ट्यांच्या आधारे ओळखतो. निर्जीवांमध्ये ही वैशिष्ट्ये दिसून येत नाहीत. ही वैशिष्ट्ये म्हणजेच सजीवांची लक्षणे आहेत. या लक्षणांचा आपण अभ्यास करूया.



२.१ : परिसरातील विविध घटक

**सांगा पाहू !** चित्रातील पिल्ले आणि प्रौढ यांच्यात कोणकोणते फरक दिसून येतात ?

### वाढ



२.२ : सजीवांतील वाढ

बाळाची वाढ होऊन त्याचे प्रौढ स्त्री किंवा पुरुषात रूपांतर होते. वाढीच्या काळात उंची, वजन, ताकद इत्यादींमध्ये वाढ होत असते. सर्व प्राण्यांची अशी वाढ होऊन ते प्रौढ होण्यास ठराविक कालावधी लागतो. मानवाच्या अशा वाढीस सर्वसाधारणपणे १८ ते २१ वर्षे लागतात.

कोंबडी, गाय, कुत्रा यांची पिल्ले प्रौढ होण्यास किती कालावधी लागतो याबाबत माहिती मिळवा.

# 2. The Living World



**Can you recall ?**

**List the things seen in the picture. Say whether they are living or non-living things.** **Read and understand.**

## Characteristics of living things

There are many kinds of plants and animals around us. They show some similarities and some differences. Yet, with the help of certain features, we can tell that they are all living things. These features are not seen in non-living things. Such features are said to be the characteristics of living things. Let us study these characteristics.




**2.1 : Various things in our environment**



**Can you tell ?**

What differences do we see between the young ones and the adults in the picture?

## Growth



**2.2 : Growth in living things**

A baby grows up to become an adult person – woman or man. During the period of its growth, the baby gains in height, weight and strength. In the same manner, all animals grow into adults in a certain period. Generally, humans require 18 to 21 years for this growth.

Find out how long it takes for the young ones of hens, cows and dogs to grow into adults.

रियाज




**जरा सोचो .......... बताओ**

टेस्ट सोडवा

यदि प्रकृति में सुंदर – सुंदर रंग नहीं होते तो ..........

पहर दो पहर क्या,
अनेकों पहर तक
इसी में रही मैं !
खड़ी देख अलसी
लिए शीश कलसी
मुझे खूब सुझी–
हिलाया–झुलाया
गिरी पर न कलसी !
इसी हार को पा,
हिलाई न सरसों,
झुलाई न सरसों,
हवा हूँ, हवा मैं,
बसंती हवा हूँ।





**मैंने समझा**



------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------



**शब्द वाटिका**

**नए शब्द**
बावली = सीधी–सी, अपनी धुन में
मस्तमौला = मनमौजी
फिकर = चिंता
महुआ = एक प्रकार का वृक्ष
झकोरा = झोंका
पहर = प्रहर
अलसी, सरसों = तिलहन के प्रकार
कलसी = गगरी

**भाषा की ओर**



दिए गए शब्दों के लययुक्त शब्द लिखो ।

| शब्द | लययुक्त शब्द |
|---|---|
| हवा | ........ |
| बावली | ........ |
| सरसों | बरसों |
| अलसी | ........ |
| महुआ | ........ |

❑ प्राकृतिक आपदाओं (भूकंप, बाढ़, अकाल आदि) से बचाव के उपाय बताएँ और विद्यार्थियों से कहलवाएँ । अन्य कविता सुनाएँ, दोहरवाएँ, इसमें सभी को सहभागी करें । प्रकृति के संतुलन एवं संवर्धन संबंधी जानकारी दें, प्रत्येक के सहयोग पर चर्चा करें ।

❑ **कृति/प्रश्न हेतु अध्यापन संकेत** – प्रत्येक कृति/प्रश्न को शीर्षक के साथ दिया गया है । दिए गए प्रत्येक कृति/प्रश्न के लिए आवश्यक सामग्री उपलब्ध करें । क्षमताओं और कौशलों के आधार पर इन्हें विद्यार्थियों से हल करवाएँ । आवश्यकतानुसार विद्यार्थियों का मार्गदर्शन करते हुए अन्य शिक्षकों की भी सहायता प्राप्त करें । 'दो शब्द' में दी गई सूचनाओं का पालन करें ।

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| सहावी मराठी | सहावी गणित | सेमी गणित | सहावी इंग्रजी | सहावी इतिहास |
|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

| सहावी भूगोल | सहावी विज्ञान | सेमी विज्ञान | सहावी हिंदी |
|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
| | | आठवी | नववी | दहावी | | |

गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here